# मानसिक समुपदेशनासाठी हेल्पलाइन

**पुणे, दि. २४ -** मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करून गरजूंना मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'मुक्ता चॅरिटेबल ट्रस्ट'तर्फे मोफत मेंटल हेल्थ हेल्पलाइन सुरू केल्याचे ट्रस्टच्या सचिव डॉ. रूपा अगरवाल यांनी सांगितले. व्यवसाय, नातेसंबंध आणि मनातील कोणत्याही दैनंदिन समस्यांबाबत दर्जेदार, निनावी आणि पूर्वग्रहरहित मानसिक आरोग्य समुपदेशन तज्ज्ञांमार्फत या हेल्पलाइनद्वारे (७८८७८८९८८२) माहिती पुरविली जाणार आहे.